## * शिष्यवृत्ती व फी माफी *

शिष्यवृत्ती व फी माफीसाठी विद्यार्थिनींनी खालील अटी पूर्ण केल्या पाहिजेत.

१)एकापेक्षा जास्त सवलतीचा फायदा विद्यार्थिनींना घेता येणार नाही. जास्तीत जास्त फायदा असणारी सवलत विद्यार्थिनीस दिली जाईल. २) नियमित उपस्थिती आवश्यक आहे.

३)महाविद्यालयाच्या सर्व परीक्षात विद्यार्थिनी उत्तीर्ण झालेली असली पाहिजे.

४) अभ्यासातील प्रगती व विद्यार्थिनी वर्तणूक समाधानकारक असली पाहिजे.

ई.बी.सी.

अ) शासन निर्णय कृ.ई.बी.सी./२०११/प्र.कृ.७४/माशि–२/दि.२५ मे २०१२ नूसार ज्या विद्यार्थीनिंच्या आई–वडीलांचे/पालकांचे मागील वर्षीचे उत्पन्न रू.१,००,००० आहे. तसे मा.तहसीलदार यांचे उत्पन्नांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. तेच विद्यार्थीनी या सवलतीस पात्र राहतील.

ब) ही सवलत मिळणाऱ्या विद्यार्थिनींना अध्ययन शुल्क, प्रयोगशाळा शुल्क भरावे लागणार नाही.

क)विद्यार्थिनींनी प्रवेश घेतेवळी विहित नमुन्यातील दोन प्रतीत अर्ज सादर करावा.

ड) अर्जासोबत ठराविक नमुन्यात नोंद केलेल्या उत्पन्नाच्या प्रतिज्ञापत्राच्या दोन प्रती जोडणे आवश्यक आहे.

इ) नापास झालेल्या विद्यार्थिनींना सवलतीचा लाभ मिळणार नाही.

ई) एखाद्या विद्यार्थिनीने प्रत्येक विषयामध्ये नियमाप्रमाणे ७५ टक्के हजेरी पूर्ण केली नसल्यास तिला वरील फी माफी मिळणार नाही. तसेच विद्यार्थिनी जर परीक्षेस बसली नाही तर तिची सवलत रद्द केली जाईल व तिच्याकडून पूर्ण शुल्क वसूल केले जाईल.

उ) ज्या विद्यार्थिनींना मागील वर्षी ही सवलत मिळत होती त्यांना नुतनीकरणाचा अर्ज भरावा लागेल.

जी.ओ.आय.शिष्यवृत्ती :–

अनु.जाती/जमाती व भटक्या विमुक्त जातीच्या पात्र विद्यार्थिनींना भारत सरकारची (जी.ओ.आय.)शिष्यवृत्ती मिळते.

१) जी.ओ.आय.शिष्यवृत्ती धारक विद्यार्थिनींसाठी आधार कार्ड आवश्यक आहे.

२) पात्र विद्यार्थिनीनी शिष्यवृत्ती अर्ज सुवाच्च अक्षरात भरून योग्य त्या कागदपत्राच्या प्रमाणित प्रतीसह दिलेल्या तारखेच्या आत कार्यालयात देण्याची दक्षता घ्यावी.

३) सूचना फलकावर लावण्यात येणाऱ्या सूचना वाचून त्रुटीची पूर्तता करावी.

४) कार्यालयात शिष्यवृत्ती मंजूरीबाबत विचारणा करावी.

५)जी.ओ.आय.शिष्यवृत्ती धारकांना डुप्लीकेट टी.सी.वर प्रवेश दिला जाणार नाही.६) दुसऱ्या जिल्ह्यातून विद्यार्थिनी आली असेल तर जिल्हा बदली प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.

७) मागील वर्षी ज्यांना ही शिष्यवृत्ती मिळत होती त्यांनी नुतणीकरणासाठी संपूर्ण तपशीलासहित अर्ज करावा.

७) शिष्यवृत्ती मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार संबंधित खात्याचा असून महाविद्यालयाचा त्याच्याशी काहीही संबंध नाही.

**फ्रीशीप :–**

१) पालकाचे मासिक उत्पन्न दोन लाखापर्यंत.

२) विद्यार्थिनी नापास झाली असल्यास. (पुनर्प्रवेश)

३) दोन नंतरचे अपत्य असल्यास त्यांनी फ्रीशीपसाठी अर्ज करावा.

**प्राथमिक शिक्षकांच्या मुलींसाठी शैक्षणिक सवलत :–**

महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती जाहीर केल्या आहेत. फी माफीची सवलत खालील अटीवर देण्यात येते.

१) अर्जदार विद्यार्थिनीचे आई/वडील पूर्ण वेळ प्राथमिक शिक्षक असावेत.

२) नियमित उपस्थिती असणे आवश्यक.

३) समाधानकारक प्रगती.

४) ठराविक नमुन्यातील अर्ज भरून पालकाच्या नोकरीच्या प्रमाणपत्रासह गट विकास अधिकाऱ्यांच्या सही शिक्क्यासह कार्यालयात दाखल करावेत.

५) आई जर प्राथमिक शिक्षिका असेल तर त्यांचे नवीन नाव गॅझेटमध्ये बदलून आले पाहिजे अन्यथा फी माफीची सवलत मिळत नाही.

६) ही सवलत मिळणाऱ्या विद्यार्थिनींना शुल्क दराच्या तक्त्यातील शुल्क क्रमांक २,३,५ सोडून इतर नियमाप्रमाणे सर्व शुल्क भरावे लागेल.

**प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुलींना शिष्यवृत्ती :–**

* मान्यताप्राप्त प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांना अप्रत्यक्ष सहाय्य देणे या उद्देशाने ही शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली आहे. शालेय अभ्यासक्रमानंतरच्या सर्वसामान्य पूर्णवेळ अभ्यासासाठी बारावीमध्ये ६० % किंवा त्यापेक्षा जास्त गुण असणाऱ्या विद्यार्थिनी या शिष्यवृत्तीस पात्र ठरतात. ठराविक नमुन्याचा अर्ज प्राचार्यामार्फत शिक्षण संचालकाकडे ठराविक तारखेच्या आत करावा लागतो.

**स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलींना शैक्षणिक सवलती :–**

मागील काही वर्षापासून महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्य सैनिकांच्या अविवाहित मुलींनाच या सवलतीचा फायदा मिळू शकेल अशी तरतूद केली आहे. सविस्तर माहितीसाठी कार्यालयात संपर्क साधावा.

**शारीरिक अपंग शिष्यवृत्ती :–** शारीरिक अपंग असणाऱ्या विद्यार्थिनींना ही शिष्यवृत्ती दिली जाते. संबंधित खात्याने दिलेल्या नियमाच्या आधीन राहून विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयात सादर करावा. महाविद्यालयाने मागवलेली माहिती व कागदपत्रांची पूर्तता विद्यार्थिनींने करावी. चुकीची माहिती पुरविल्यास संबंधित विद्यार्थिनी शिक्षेस अथवा दंडास पात्र राहील.